# मनोगत

या वर्षीचा दत्तजयंतीचा कार्यक्रम परिज्ञान छाया मध्ये नेहमीच्या उत्साहात पार पडला. साठेक जणांनी हजेरी लावली होती. ती पदयात्रा व त्यानंतर नायंपल्ली यांच्या घरी साजरा होणारा दत्त जयंतीचा कार्यक्रम आम्ही अजूनही मिस करतो. त्यात एक आगळी वेगळी मजा यायची. पूर्वी घरी येणारा प्रज्ञाचा अंक आणि आताचा डिजिटल अंक यात वाचकवृंदाला कुठला अंक जास्त आवडतो ते आम्हाला जरूर कळवा.

माझी एकदा एका सत्पुरुषाशी गाठ पडली,

मी त्यांना सहज विचारले, गुरुची कृपा किती होऊ शकते ?
ते त्या वेळी एक सफरचंद खात होते. त्यांनी एक सफरचंद माझ्या हाती ठेवले आणि विचारले, सांगा पाहू यांत किती बिया असतील ?

सफरचंद कापून मी त्यांतील बिया मोजल्या आणि म्हणालो, यात तीन बिया आहेत त्यांनी त्यातील एक बी आपल्या हाती घेतली आणि मला विचारले, या एका बीमध्ये किती सफरचंदे असतील असे तुला वाटते ?

मी मनातल्या मनातच हिशोब करू लागलो, ह्या एका बीपासून एक झाड, त्या झाडावर अनेक सफरचंदे लागणार, त्या प्रत्येक सफरचंदांत पुन्हा तीन बिया, त्या प्रत्येक बीमधून पुन्हा एक झाड, त्या झाडांना पुन्हा तशीच तीन बिया असणारी फळे लागणार. अबब! ही प्रक्रिया चालूच राहणार! कसा सांगू मी त्या बीमध्ये असलेल्या भावी फळांची संख्या?. मी चक्रावलोच.

माझी अशी अवस्था पाहून ते सद्गृहस्थ मला म्हणाले, अशीच गुरूंची कृपा आपल्यावर बरसत असते. आपण फक्त भक्तीरूपी एकाच बीजाची रुजवण आपल्या मनांत करवून घेण्याची गरज आहे. गुरू एक तेज आहे. गुरूंचे एकदा आपल्या आयुष्यात आगमन झाले की मनातील संशयरूपी अंधःकार कुठल्याकुठे पळून जातो. गुरू म्हणजे एक असा मृदंग आहे की ज्याच्या एका झंकाराने अनाहत नाद ऐकू यायला सुरुवात होते. गुरू म्हणजे असे ज्ञान आहे की ज्याची प्राप्ती झाल्याबरोबर मनातील भयाची सगळी भावनाच लोप पावते.

गुरू ही एक अशी दीक्षा आहे की ज्याला गुरूदीक्षा प्राप्त झाली तो हा भवसागर तरून गेलाच म्हणून समजा. गुरू ही एक अशी नदी आहे जी सतत आपल्या प्राणांतून वाहत असते.

गुरू म्हणजे असा सत् चित् आनंद आहे जो आम्हाला आमची खरी ओळख करून देतो. गुरू म्हणजे एक बासरी आहे जिच्या नुसत्या मंजुळ आवाजानेच आपले मन आणि शरीर आत्मानंदात मग्न होऊन जाते. गुरू म्हणजे केवळ अमृत आहे ह्या अमृताच्या सेवनाने तहान कायमची आणि पूर्णपणे शमते.

गुरू म्हणजे एक अशी कृपा असते जी केवळ काही भाग्यवान आणि सत्पात्री शिष्यांनाच प्राप्त होते आणि काहींना अशी कृपा मिळूनही ती मिळालेली त्यांना समजत नाही. गुरू कुबेराचा अक्षय्य खजिनाच आहे आणि त्या खजिन्याचे मोल कधीच होऊ शकत नाही. गुरू म्हणजे एक प्रसाद आहे, हा प्रसाद ज्याच्या भाग्यात असेल त्याला आणखीन कांही मागण्याची इच्छाच उरत नाही. जय परिज्ञान !

❑ ❑ ❑

# आशीर्वचन

## नववे गुरू स्वामी आनंदाश्रम (क्रमशः)

आता श्री गुरूमहाराजांनी केलेल्या कार्याकडे वळू व त्यांच्या परमपवित्र चरित्रापासून बोध घेण्याचा यथाशक्ती प्रयत्न करू..

शुभकृत् संवत्सरी ज्येष्ठ शुद्ध अष्टमीस (इ.स. २९-६-१९०२) यांचा जन्म झाला. त्यांचे पूर्वाश्रमीचे नांव शांतमूर्ति. जुन्या पद्धतिप्रमाणे आजोबांचेच नांव यांना ठेवले होते व यांच्या स्वभावाला हे नांव अगदी यथायोग्य शोभत असे. यांचा कानडी अभ्यास शिराली येथील कानडी शाळेत झाला. लहानपणापासुनच यांच्या मनाचा कल धार्मिक गोष्टींकडेच अधिक होता. काही अंशी धर्माचे ज्ञान यांना स्वगृही वडिलांकडूनच मिळाले होते.

आपल्या घरच्या गोपालकृष्णाच्या पूजेला जरूर असलेली फुले, बिल्व, तुळशी वगैरे आणण्यासाठी ते दररोज भल्या पहाटे उठून जात असत. वयाच्या आठव्या वर्षी त्यांची मुंज झाली. आपल्या देवालयांतील गोपालकृष्णावर यांची फारच श्रद्धा असे. कृष्ण जयंतीच्या उत्सवाच्या वेळी वडिलांबरोबर ते दररोज न चुकता भजन करीत असत. नंतर सुद्धा वेळ काढून ते कृष्णजयंतीला जात असत.

शिष्य स्वीकार झाल्यानंतर गुरूंच्या देखरेखीखाली धर्मशास्त्राच्या अध्ययनाचा लाभ त्यांना घेता आला नाही. पण ज्ञान संपादन करण्याची त्यांची तीव्र इच्छा असल्यामुळे शास्त्री वे. सुब्रायभटजी तसेच आपल्या गुरूंच्या देखरेखीत शिकून पारंगत झालेल्या इतर वेदमूर्तींच्या सहाय्याने त्यांनी संस्कृत, व्याकरण, काव्य, तर्कशास्त्र इत्यादि विषयांचे अध्ययन केले व सर्व विषयांत लवकरच प्रावीण्य मिळवले. ते एकदा गोकर्णास गेले असता तेथे हृषिकेशहून आलेल्या कृष्णाचार्य स्वामींची व यांची भेट झाली. त्यांची गाढ विद्वत्ता पाहून त्यांच्याकडेच काही अध्ययन करावे असा यांनी मनाशी निश्चय केला व कृष्णाचार्य हृषिकेशीस परत गेल्यावर इ.स. १९२७ साली स्वामीजी स्वतः हृषिकेशीस गेले व काही महिने तेथेच राहून कृष्णाचार्य स्वामींकडे श्री शंकराचार्यांच्या 'ब्रह्मसूत्रभाष्याचे' अध्ययन केले.

हृषिकेशीस जाताना वाटेत हुबळी, पुणे, मुंबई, दिल्ली वगैरे शहरांना भेट देऊन देशसंचारामुळे मिळणारे ज्ञानही त्यांनी मिळवले. हृषिकेशीमध्ये राहिलेल्या अवधीत सूत्रभाष्याचा अभ्यास पूर्ण न झाल्याने श्री कृष्णाचार्यांनाच चित्रापुरास बोलावून घेऊन सूत्रभाष्याचे अध्ययन त्यांनी पूर्ण केले. स्वामीजींचे अपरिमेय बुद्धीसामर्थ्य व उच्च तर्हेची ग्रहण शक्ति पाहून कृष्णाचार्यांना फारच आश्चर्य व आनंद झाला. आपले स्वामीजी एक प्रख्यात व विद्वान मठाधीश होणार असे ते बोलून दाखवीत. हृषिकेशहून परत आल्यानंतर स्वामीजींनी सन १९२८ साली गोकर्ण येथील भंडीकेरी मठ पुनरपि नव्याने बांधवून तेथील प्रथम परिज्ञानाश्रम स्वामीजींच्या समाधीचा जीर्णोद्धार केला.

कानडी, मराठी, संस्कृत, हिंदी, इंग्लिश वगैरे पुष्कळ भाषा त्यांना चांगल्याच अवगत होत्या. ते वाक्चतूर असून प्रवचने करण्यात फारच निष्णात होते. स्वामीजी संचाराकरिता आले असता धार्मिक व पारमार्थिक विषयांवर अत्यंत सुरसपणे बोधपर प्रवचने देत असत. त्यांची प्रवचने ऐकून सर्वांची अंतःकरणे उल्हसित होत. असे मठाधीश आपल्याला मिळाले हे आमचे परमभाग्य होय. ते नेहेमी ब्रह्मानंदातच असल्यामुळे आनंदाश्रम हे त्यांचे नाव योग्य आणि यथार्थ होते.

❑ ❑ ❑

# IN QUEST OF GOD - TIRUPATI

"Sleep is quite out of the question," again said the Sadhuram. Poor friend, Ram was sorely testing him, all for his good and good alone. The night passed. Early morning, when the day was breaking, the shivering Sadhu proposed a climb down the hill. But Ramdas suggested that they might go farther on about three miles, and visit the waterfall called "Papanasini". The general belief is, that the person who takes bath in this waterfall, will be washed of all his or her sins; hence the name. The Sadhuram agreeing, both proceeded to this spot and bathed in the waters falling down a rock with great force. Since it was broad daylight now, the top of the hill in all directions was seen clearly. The beautiful landscapes and valleys that met the eyes were simply entrancing. Bath over, the Sadhuram hastened down the hill, followed by Ramdas, and before evening they reached the city below. The same evening, both boarded a train running northwards.

GOD IS EVERYWHERE

THEY travelled to Kalahasti. After a day's stay here, they left for Jagannath Puri. It was noon. The Sadhuram and Ramdas were in the train. A Ticket Inspector, a Christian, dressed in European fashion, stepped into the carriage at a small station, and coming up to the Sadhus asked for tickets. "Sadhus carry no tickets, brother, for they neither possess nor care to possess any money," said Ramdas in English. The Ticket Inspector replied: "You can speak English. Educated as you are, you cannot travel without a ticket. I have to ask you both to get down." The Sadhuram and he accordingly got down at the bidding of the Inspector. "It is all Ram's will," assured Ramdas to his guide. They were now on the platform and there was still some time for the train to start. The Ticket Inspector, meanwhile, felt an inclination to hold conversation with Ramdas who, with the Sadhuram, was waiting for the train to depart.

"Well," broke in the Inspector looking at Ramdas. "May I know with what purpose you are travelling in this manner?" "In quest of God," was his simple reply. "They say God is everywhere," persisted the Inspector, "then, where is the fun of your knocking about in search of Him, while He is at the very place from which you started on this quest, as you say?" "Right, brother," replied Ramdas, "God is everywhere but he wants to have this fact actually proved by going to all places and realising His presence everywhere."

"Well then," continued the Inspector, "if you are discovering God wherever you go, you must be seeing Him here, on this spot, where you stand."

"Certainly, brother," rejoined Ramdas, "He is here at the very place where we stand."

"Can you tell me where He is?" asked the Inspector.

"Behold, He is here, standing in front of me!" exclaimed Ramdas enthusiastically.

❑ ❑ ❑

# MAYA AND FREEDOM – 4

## (Lecture delivered by **"SWAMI VIVEKANANDA"** in London)

On the one side, therefore, is the bold assertion that this is all nonsense, that this is Maya, but along with it there is the most hopeful assertion that beyond Maya, there is a way out. On the other hand, practical men tell us, "Don't bother your heads about such nonsense as religion and metaphysics. Live here; this is a very bad world indeed, but make the best of it." Which put in plain language means, live a hypocritical, lying life, a life of continuous fraud, covering all sores in the best way you can. Go on putting patch after patch, until everything is lost, and you are a mass of patchwork. This is what is called practical life. Those that are satisfied with this patchwork will never come to religion. Religion begins with a tremendous dissatisfaction with the present state of things, with our lives, and a hatred, an intense hatred, for this patching up of life, an unbounded disgust for fraud and lies. He alone can be religious who dares say, as the mighty Buddha once said under the Bo-tree, when this idea of practicality appeared before him and he saw that it was nonsense, and yet could not find a way out. When the temptation came to him to give up his search after truth, to go back to the world and live the old life of fraud, calling things by wrong names, telling lies to oneself and to everybody, he, the giant, conquered it and said, "Death is better than a vegetating ignorant life; it is better to die on the battle-field than to live a life of defeat." This is the basis of religion. When a man takes this stand, he is on the way to find the truth, he is on the way to God. That determination must be the first impulse towards becoming religious. I will hew out a way for myself. I will know the truth or give up my life in the attempt. For on this side it is nothing, it is gone, it is vanishing every day. The beautiful, hopeful, young person of today is the veteran of tomorrow. Hopes and joys and pleasures will die like blossoms with tomorrow's frost. That is one side; on the other, there are the great charms of conquest, victories over all the ills of life, victory over life itself, the conquest of the universe. On that side men can stand. Those who dare, therefore, to struggle for victory, for truth, for religion, are in the right way; and that is what the Vedas preach: Be not in despair, the way is very difficult, like walking on the edge of a razor; yet despair not, arise, awake, and find the ideal, the goal.

Now all these various manifestations of religion, in whatever shape and form they have come to mankind, have this one common central basis. It is the preaching of freedom, the way out of this world. They never came to reconcile the world and religion, but to cut the Gordian knot, to establish religion in its own ideal, and not to compromise with the world. That is what every religion preaches, and the duty of the Vedanta is to harmonise all these

aspirations, to make manifest the common ground between all the religions of the world, the highest as well as the lowest. What we call the most arrant superstition and the highest philosophy really have a common aim in that they both try to show the way out of the same difficulty, and in most cases this way is through the help of someone who is not himself bound by the laws of nature in one word, someone who is free. In spite of all the difficulties and differences of opinion about the nature of the one free agent, whether he is a Personal God, or a sentient being like man, whether masculine, feminine, or neuter and the discussions have been endless the fundamental idea is the same. In spite of the almost hopeless contradictions of the different systems, we find the golden thread of unity running through them all, and in this philosophy, this golden thread has been traced revealed little by little to our view, and the first step to this revelation is the common ground that all are advancing towards freedom.

One curious fact present in the midst of all our joys and sorrows, difficulties and struggles, is that we are surely journeying towards freedom. The question was practically this: "What is this universe? From what does it arise? Into what does it go?" And the answer was: "In freedom it rises, in freedom it rests, and into freedom it melts away." This idea of freedom you cannot relinquish. Your actions, your very lives will be lost without it. Every moment nature is proving us to be slaves and not free. Yet, simultaneously rises the other idea, that still we are free At every step we are knocked down, as it were, by Maya, and shown that we are bound; and yet at the same moment, together with this blow, together with this feeling that we are bound, comes the other feeling that we are free. Some inner voice tells us that we are free. But if we attempt to realise that freedom, to make it manifest, we find the difficulties almost insuperable Yet, in spite of that it insists on asserting itself inwardly, "I am free, I am free." And if you study all the various religions of the world you will find this idea expressed. Not only religion — you must not take this word in its narrow sense but the whole life of society is the assertion of that one principle of freedom. All movements are the assertion of that one freedom. That voice has been heard by everyone, whether he knows it or not, that voice which declares, "Come unto Me all ye that labour and are heavy laden." It may not be in the same language or the same form of speech, but in some form or other, that voice calling for freedom has been with us. Yes, we are born here on account of that voice; every one of our movements is for that. We are all rushing towards freedom, we are all following that voice, whether we know it or not; as the children of the village were attracted by the music of the flute-player, so we are all following the music of the voice without knowing it.

❑ ❑ ❑

# THE CHIDAKASHA GITA OF BHAGAWAN NITYANANDA OF GANESHPURI

## With Commentary by Sadguru Kedarji

56. In Pranayama, Pooraka is drawing up the breath. Kumbhaka is retaining the breath. Rechaka is exhaling the breath. These three kinds of breath are from within. Nothing is taken from outside. While thus the practice is going on, the Prana will move only in one nerve. We then feel the internal joy. Who can describe this Brahmananda? The outside world will then be forgotten. We will then be in the world beyond.

Commentary: Pranayama is a specific meditation technique that involves instruction in how to direct the breath into the central nerve, also known as the subtle body or Sushumna Nadi. This central channel is one of three, primary channels in the body. Pranayama is a technique that involves Pooraka, the inward/downward breath and, Rechaka, the upward/outward breath (also called Prana), and the retention of breath while focusing on the pause or space between the breaths. When instructed properly, this movement of breath is directed inside the Sushumna and, while continuing to move, remains in Sushumna Nadi. While the breath moves in the central nerve, no breath is taken from outside. In this way, Kundalini Shakti moves upward through all the Chakras in the subtle body and enters the heart space (Chidakasha) reflected in the head. When this occurs, the yogi experiences a profound sense of peace and joy and remains focused inside himself, with no consciousness of the outside world. This is the world beyond, the world of the Supreme Principle.

57. "This world" means Jivatman. The "next world" means the union of Jivatman and Paramatman.

Commentary: The Jiva or Jivatman is the individual bound soul who creates endless karmas out of ignorance of the Truth. This world-appearance is the realm or plane of the Jiva. It exists for the sport of Shiva that is a Play of Divine Consciousness in which these karmas are being worked out as part of the free evolution of beings. The "next world" is the world in which the Jiva becomes Shiva by merging her individual, limited identity with the Divine Consciousness of Shiva-Shakti, with the Absolute that is Paramatman or Paramashiva. This union is the "next world."

58. Just as small rivers enter the sea, our attention must be fixed on the internal breath.

Commentary: Every river eventually merges with the ocean. In the same way, every person will, eventually have to retrace his/her steps back to God. The internal breath is the means. The internal breath is the movement of Prana inside the Sushumna Nadi. Through internal breathing or "Sushumna breathing," Kundalini Shakti is channeled into the Sahasrar. When our attention is focused on internal breathing, individual consciousness is united with God and, just as the small rivers enter the sea, our limited identity is merged in the ocean of Divine Consciousness.

❑ ❑ ❑

# Tera (13) Saath (7)
## तू स्वयंभू शिवस्वरूपच, तूच तो कार्लेश्वर

**- Late Shri Shankar Chandavarkar**

Our Swamiji had his own way of pacifying His devotees who would go to Him for having their problems redressed. The incident which I want to share with our community is narrated below.

Swamiji had once given a pair of Holy Padukas of H. H. Anandashram Swamiji to me as Prasad in 1975. Owning a pair of Padukas of any of our Swamijis means everything for us Chitrapur Saraswats and that too presented by His Shishya himself was like the proverbial 'Icing on the cake'. I felt like I was floating on cloud nine and my joy knew no bounds. Immediately I started performing pooja. Within 8 days some disgruntled and envious gentlemen started a canard against me and this news reached my ears. I heard that these gentlemen had even gone about pestering Swamiji that the Padukas should have been given to a certain Local Sabha instead of an individual. On 8th day when I had gone for some discussions with Swamiji, He also confirmed what these gentlemen were speaking about. And I reluctantly requested Swamiji that the Padukas be taken back. Swamiji was saddened by this and on my insistence accepted the Padukas.

He did not want me to go empty handed and at once asked me to stretch my palms towards Him and placed something inside them which felt soft and warm to my senses. I could not believe what I was about to see ! The soft and warm thing which was given to me started cooling and also began to harden. When I opened my palm, I couldn't believe my eyes. It was an opaque egg shaped 'Linga' which He gifted to me. It was like the saying, 'आंधळा मागतो एक डोळा, देव देतो दोन डोळे'.

Jai Parijnan!

❑ ❑ ❑

# अमृतवाणी

## वेदांत हा रोजच्या आचरणात आणला पाहिजे.

भगवंताची उपासना करणारे जे ऋषी असतात त्यांचे मन अशा एका अवस्थेमध्ये राहते की, त्या ठिकाणी परमात्माच सर्व काही करतो ही भावना स्पष्टपणे प्रकट होते. भगवंताशी एकरूप होऊन जाण्याचीच ती अवस्था आहे. ऋषींचा मीपणा नष्ट झालेला असल्याने, 'मी करतो, मी बोलतो, मी काव्य करतो,' ही भावनाच त्यांना नसून, 'परमात्मा करतो, परमात्मा बोलतो, परमात्मा मंत्र रचतो' असा स्पष्ट आणि खरा अनुभव त्यांना येतो. या थोर अवस्थेमध्ये ऋषींच्या तोंडून वेदमंत्र बाहेर पडलेले असल्यामुळे ते मानवाची कृती नव्हेत. वेद हे खरे अपौरुषेयच आहेत. घराच्या छपराखाली ज्याप्रमाणे सर्व लहान लहान खोल्या येतात, त्याप्रमाणे वेदांतात इतर शास्त्रे येतात. वेदांताच्या गोष्टी किंवा ज्ञान हे पक्कान्नांच्या ज्ञानाप्रमाणे आहे. जो मनुष्य वेदांताचा नुसताच अभ्यास करतो त्याला त्यापासून फारसा फायदा होत नाही. वेदांत हा रोजच्या आचरणात आणला पाहिजे. खरे म्हणजे विद्वान लोक हा वेदांत अत्यंत कठीण करून जगाला उगीच फसवितात. मग सामान्य माणसाला वाटते की, 'अरे, हा वेदांत आपल्यासाठी नाही !' वास्तविक, वेदांत हा सर्वांसाठी आहे. मनुष्यमात्रासाठी आहे. वेदांताशिवाय मनुष्याला जगताच येत नाही. आपले आकुंचित मन विशाल करणे, आपण स्वार्थी आहोत ते निःस्वार्थी बनणे, हेच खर्‍या वेदांताचे मर्म आहे.

भगवंताच्या प्राप्तीचे नियम आणि व्यवहारातील वस्तू प्राप्त करून घेण्याचे नियम यांमध्ये फरक आहे. मनामध्ये वासना उत्पन्न झाली असतां ती तृप्त करून घेण्यासाठी देहाची आणि वस्तूंची हालचाल करणे, हा व्यवहार होय. सूक्ष्म वासना देहाच्या सहाय्याने जड बनणे हे व्यवहाराचे स्वरूप आहे. याच्या उलट, भगवंत अत्यंत सूक्ष्म असल्यामुळे, त्याची प्राप्ती करून घेणे म्हणजे जडामधून सूक्ष्माकडे जाणे आहे. तेव्हां भगवंताचे साधन हेही जडापासून सूक्ष्माकडे पोचविणारे असले पाहिजे. जड देहाशी संबंधित आणि सूक्ष्माशी निकट चिकटलेले असे साधन असेल तर ते एक नामच होय. जो नामात राहिला त्याचा वासनाक्षय झाला. पुष्कळ वेळा, चांगले अधिकारी जीव एखाद्या लहानशा वासनेमुळे अडकून पडतात. मग ते अध्यात्मदृष्ट्या चांगल्या कुळामध्ये जन्म घेतात. तिथे त्यांची वासना तृप्त व्हायला वेळ लागत नाही; म्हणून ते लहानपणीच जग सोडून जातात. त्यांच्या मृत्यूचे दुःख करणे बरोबर नाही. वासना ही दुसर्‍या कोणत्याही उपायांनी तृप्त होण्यासारखी नसून, आपण जर भगवंताजवळ 'वास' ठेवला तरच ती नष्ट होते. वासना नष्ट झाली की बुद्धी भगवत्स्वरूपच होईल. जेथे वासना संपली तेथेच भगवंताची कृपा झाली.

**✻प्रत्येक वेदमंत्राच्या आरंभी 'हरिः ॐ' असते, ते नामच आहे.✻**

❑ ❑ ❑

## प्रसिद्धीपासून दूर राहिलेले महान संत – नीला बलसेकर

## संत कवयित्री जनाबाई

जनी जरी देवळात जाऊ शकली नाही तरी पांडुरंग या वेड्या जनीच्या भेटीला रोज येत असे! दळणकांडण, धुणी, एवढेच काय पण शेणाच्या गोवऱ्या थापताना सुद्धा त्या विठ्ठलाचे नामस्मरण चाले. रोजचीच कष्टाची कामे, पण विठोबाच्या निरंतर नामस्मरणाने तिचे कष्ट तर हलके होतच, पण केलेल्या कामावर देखील एक वेगळीच झळाळी चढायची !

कबीरदास काशीहून नामदेवांना व इतर संतांना भेटण्यासाठी पंढरीत मुद्दाम आले. नामदेवांना व त्यांच्या विठ्ठल वेड्या जनाबाईला भेटायला त्यांच्या घरी गेले. बाहेर माळावर जनाबाईचे शेजारणीबरोबर कडाक्याचे भांडण चालले होते. शेजारणीने जनीच्या गोवऱ्या चोरल्या होत्या.

कबीरदासांना मोठे आश्चर्य वाटले. ही बाई विठ्ठलाची भक्त म्हणवते आणि साध्या गोवर्यासाठी एवढे मोठे भांडण. लोक भांडण सोडवायला आले तेंव्हा जनाबाई म्हणाली, या गोवर्या साध्यासुध्या नाहीत, त्यातून 'विठ्ठल विठ्ठल' नाद ऐकू येतो. पहा कानाला लावून हवं तर आणि खरंच गोवर्या कानाला लावल्या असता 'विठ्ठल विठ्ठल' असा नाद ऐकू आला. शेजारणीने निमूटपणे गोवऱ्या परत केल्या. धन्य ती जनाबाई! जिने सतत नामस्मरणाने, मोठमोठ्या योग्यांना सुद्धा हुलकावणी देणाऱ्या पांडुरंगाला आपल्या भक्तीने व सतत चालणाऱ्या नामस्मरणानं आपल्या हृदयात बंदिस्त करून ठेवला !

धरिला पंढरीचा चोर ।
प्रेमे बांधुनिया दोर ।।ध्रृ।।
ह्रुदय बंदिखाना केला ।
आंत विठ्ठल कोंडिला ।।
शब्दें केली जडाजुडी ।
विठ्ठल पायीं घातली बेडी ।।१।।
सोहं शब्दे नाद केला ।
विठ्ठल काकुळती आला ।।
जनी म्हणे बा विठ्ठला ।
जीवें न सोडीं मी तुजला ।।२।।

भक्तीप्रेमाच्या दोराने विठ्ठलाला हृदयात कोंडून ठेवला आहे. विठ्ठल विठ्ठल या सतत जपाने विठ्ठलाचा पायच निघत नाही. सोहम् म्हणजे त्या भगवंतात एकरूप झाल्यावर विठ्ठल त्या भक्ताला सोडून जाऊच शकत नाही. अगदी जीवनाच्या अंतानंतर सुद्धा !

खडतर आयुष्य वाट्याला आले तरी प्रभू नामांत रंगलेल्या जनीला त्या कष्टाचे काही दु:ख नव्हते.

नामयाचे ठेवणे जनीस लाभले । धन सांपडले विटेवरी ।।
धन्य माझा जन्म, धन्य माझा वंश । धन्य विष्णूदास नाम्या स्वामी माझा ।।

– *क्रमश पान नं. ११ वर ...*

**Ten Things a Hindu Can Do While Using English Language by Francois Gautier (He is the person knows more Hinduism than any of us)**

1. Please stop using the term "God fearing" - Hindus never ever fear God. For us, God is everywhere and we are also integral part of God. God is not a separate entity to fear.

2. Please do not use the meaningless term "RIP" when someone dies. Use "Om Shanti", "Sadgati" or "I wish this atma attains moksha/sadgati /uttama lokas". Hinduism neither has the concept of "soul" nor its "resting". The terms "Atma" and "Jeeva" are, in a way, antonyms for the word "soul".

3. Please don't use the word "Mythology" for our historic epics (Itihas) Ramayana and Mahabharata. Rama and Krishna are historical heroes, not just mythical characters.

3. Please don't be apologetic about idol worship and say “Oh, that's just symbolic". All religions have idolatry in kinds or forms - cross, words, letters (calligraphy) or direction. Also let's stop using the words the words 'idols', 'statues' or 'images' when we refer to the sculptures of our Gods. Use the terms 'Moorthi' or 'Vigraha'. If words like Karma, Yoga, Guru and Mantra can be in the mainstream, why not Moorthi or Vigraha?

4. Please don't refer to Ganesh and Hanuman as "Elephant god" and "Monkey god" respectively. You can simply write Shree Ganesh and Shree Hanuman.

5. Please don't refer to our temples as prayer halls. Temples are "devalaya" (abode of god) and not "prathanalaya" (Prayer halls).

6. Please don't wish your children "black birthday" by allowing them to blow off the candles that are kept on top of the birthday cake. Don't throw spit on the divine fire (Agni Deva). Instead, ask them to pray: "Oh divine fire, lead me from darkness to light" (Thamasomam Jyotirgamaya) by lighting a lamp. These are all strong images that go deep into their psyche.

7. Please avoid using the words "spirituality" and "materialistic". For a Hindu, everything is divine. The words spirituality and materialism came to India through evangelists and Europeans who had a concept of Church vs State. Or Science vs Religion. On the contrary, in India, Sages were scientists and the foundation stone of Sanatan Dharma was Science.

9. Please don't use the word "Sin" instead of "Paap". We only have Dharma (duty, righteousness, responsibility and privilege) and Adharma (when dharma is not followed). Dharma has nothing to do with social or religious morality. 'Paap' derives from Adharma.

10. Please don't use loose translation like meditation for "dhyana" and 'breathing exercise' for "Pranayama". It conveys wrong meanings. Use the original words.

Remember, the world respects only those who respect themselves!

********************

*Please circulate this so that people can understand about Hindu Dharma.....*

❑ ❑ ❑

---

- *क्रमश पान नं.९वरून ...*

हीन कुळात जन्माला येऊन या थोर संत कवयित्रीने स्वतःचा जन्म, कुळ साऱ्याचे सोने केले. स्वतः साठी तिने पांडुरंगापाशी काही मागितले नाही, शेवटपर्यंत ती नाम्याची दासीच राहिली. कष्टाची कामे करितच तिने भक्तीचा वसा चालविला, म्हणूनच की काय तो पांडुरंग तिचे कष्ट हलके करण्यासाठी वारंवार धावत येत असे. विठ्ठलाने जनीने कष्ट करताना तिच्यासोबत दळणकांडण केले. एवढेच नाहीतर जनीच्या घराचे छप्पर वादळात उडून गेले ते पांडुरंगाने घालून दिले. विठाबाई बनून या पोरक्या पोरीला न्हावू भरवू घातले.

कर्मकांड व पूजापाठाच्या जाळ्यात न अडकता फक्त नामस्मरण, स्वतःची कामे करता करता प्रभूचे गुणगान व चिंतन करून परमेश्वराशी जनाबाई पूर्णपणे एकरूप झाली. भक्ती मार्गातून प्राप्त झालेले अद्वैताचे ज्ञान किंवा जाणीव ही अगदी मुळापर्यंत, कणाकणातून रुजलेली असते!

❑ ❑ ❑

## संत कबीरजी के दोहे
## और उनका हिंदी अनुवाद -१२

**कहत सुनत सब दिन गए, उरझि न सुरझ्या मन।**

**कही कबीर चेत्या नहीं, अजहूँ सो पहला दिन।**

अर्थ: कहते सुनते सब दिन निकल गए, पर यह मन उलझ कर न सुलझ पाया। कबीर कहते हैं कि अब भी यह मन होश में नहीं आता। आज भी इसकी अवस्था पहले दिन के समान ही है।

**कबीर लहरि समंद की, मोती बिखरे आई।**

**बगुला भेद न जानई, हंसा चुनी–चुनी खाई।**

अर्थ:कबीर कहते हैं कि समुद्र की लहर में मोती आकर बिखर गए। बगुला उनका भेद नहीं जानता, परन्तु हंस उन्हें चुन–चुन कर खा रहा है। इसका अर्थ यह है कि किसी भी वस्तु का महत्व जानकार ही जानता है।

**जब गुण को गाहक मिले, तब गुण लाख बिकाई।**

**जब गुण को गाहक नहीं, तब कौड़ी बदले जाई।**

अर्थ: कबीर कहते हैं कि जब गुण को परखने वाला ग्राहक मिल जाता है तो गुण की कीमत होती है। पर जब ऐसा ग्राहक नहीं मिलता, तब गुण कौड़ी के भाव चला जाता है।

**कबीर कहा गरबियो, काल गहे कर केस।**

**ना जाने कहाँ मारिसी, कै घर कै परदेस।**

अर्थ: कबीर कहते हैं कि हे मानव ! तू क्या गर्व करता है ? काल अपने हाथों में तेरे केश पकड़े हुए है। मालूम नहीं, वह घर या परदेश में, कहाँ पर तुझे मार डाले।

**पानी केरा बुदबुदा, अस मानुस की जात।**

**एक दिना छिप जाएगा,ज्यों तारा परभात।**

अर्थ: कबीर का कथन है कि जैसे पानी के बुलबुले, इसी प्रकार मनुष्य का शरीर क्षणभंगुर है।जैसे प्रभात होते ही तारे छिप जाते हैं, वैसे ही ये देह भी एक दिन नष्ट हो जाएगी।

**हाड़ जलै ज्यूं लाकड़ी, केस जलै ज्यूं घास।**

**सब तन जलता देखि करि, भया कबीर उदास।**

अर्थ: यह नश्वर मानव देह अंत समय में लकड़ी की तरह जलती है और केश घास की तरह जल उठते हैं। सम्पूर्ण शरीर को इस तरह जलता देख, इस अंत पर कबीर का मन उदासी से भर जाता है।

❑ ❑ ❑